बीड । महाराष्ट्र
सोमवार दि. ३० मार्च २०२६
वर्ष ५ वे । अंक ११
पान १ । पाने ४
किंमत ३ रुपये

दैनिक महाराष्ट्राचा बुलंद आवाज • छत्रपती संभाजीनगर • जालना • बीड • परभणी • लातूर • नांदेड • धाराशिव • हिंगोली • अहिल्यानगर

# मराठवाडा पत्र

संपादक : दत्तात्रय सखाराम नरनाळे । मो. : 9822152955 E-mail : dailymarathwadapatra2021@gmail.com

RNI/MAHMAR/2021/80074 Post : Reg.No.L/226/RNP/Renewal/2025-27 https://marathwadapatra.com https://epaper.marathwadapatra.com










## महाराष्ट्राच्या राजकारणात पुन्हा...

# दोन्ही राष्ट्रवादी एकत्र येण्याची चर्चा

**मुंबई । प्रतिनिधी**

महाराष्ट्राच्या राजकारणात आता पुन्हा एकदा दोन्ही राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष एकत्र येण्याबाबतच्या चर्चांना उधाण आलं आहे. दिवंगत उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या निधननंतर दोन्ही राष्ट्रवादी एकत्र येणार असल्याच्या चर्चांना उधाण आलं होतं. पण राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे प्रदेशाध्यक्ष सुनील तटकरे आणि पक्षाचे ज्येष्ठ नेते प्रफुल्ल पटेल यांनी या चर्चांचं खंडन केलं होतं. दुसरीकडे राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाच्या काही नेत्यांकडून दोन्ही राष्ट्रवादींनी एकत्र यावे, अशी अजित पवार यांची इच्छा होती. तसेच त्यासाठी



दोन्ही पक्षांच्या ज्येष्ठ नेत्यांच्या बैठका झाल्या होत्या, असा दावा करण्यात आला होता. पण सुनील तटकरे आणि प्रफुल्ल पटेल यांनी या वृत्ताचं खंडन केलं होतं. यानंतर दोन्ही राष्ट्रवादी एकत्र येण्याच्या चर्चांना पूर्णविराम मिळाला होता. पण आता पुन्हा दोन्ही राष्ट्रवादी एकत्र येण्याच्या चर्चांना उधाण आलं आहे. त्याला राष्ट्रवादी काँग्रेसचे मावळचे आमदार सुनील शेळके यांचं वक्तव्य कारण ठरलं आहे. हा नेमका विषय काय आहे ते सविस्तर समजून घेऊयात.

राष्ट्रवादी काँग्रेसचे आमदार सुनील शेळके यांनी दोन्ही राष्ट्रवादीच्या एकत्र येण्याबाबत महत्त्वाचं वक्तव्य केलं आहे. उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार यांच्या नेतृत्वात दोन्ही राष्ट्रवादींचं विलीनीकरण झालं तर ती अभिमानाची बाब असेल, असं वक्तव्य सुनील शेळके यांनी केलं आहे. तसेच दोन्ही राष्ट्रवादीच्या विलीनीकरणाची अजून वेळ निघून गेलेली नाही, असंही वक्तव्य सुनील शेळके यांनी केलं आहे. त्यामुळे दोन्ही राष्ट्रवादीच्या विलीनीकरणाच्या चर्चांना पुन्हा उधाण आलं आहे.

सुनील शेळके नेमकं काय म्हणाले ?

दिवंगत उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या पश्च्यात राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या राष्ट्रीय अध्यक्ष उत्तराधिकारी म्हणून सुनेत्रा वहिनी व्हायला पाहिजेत. ▶▶ उर्वरित पान २ वर

## 1500 फुटापर्यंतचे सरकारी जागेवरील अतिक्रमण नियमाकूल करणार : चंद्रशेखर बावनकुळे

**मुंबई । प्रतिनिधी**

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वाखाली सरकारने आणि महसूल विभागाने २०११ पूर्वीचे सरकारी जागेवरील १५०० फुटापर्यंत अतिक्रमण असेल तर ते नियमाकूल करता येईल असा निर्णय घेतला आहे.सरकारी जागेवर लोकांना त्यांची हक्काची घर मिळाली पाहिजेत याकरिता हा निर्णय घेतला आहे.राज्यातील जवळपास १५ लाख पेक्षा जास्त कुटुंबांना याचा फायदा होणार आहे.१५०० फुटांपेक्षा जास्त



अतिक्रमण काढून टाकले जाईल.

सरसकट सर्वांना पट्टा मिळाल्यानंतर त्याची नोंदणी १००० रूपयात करून घेतली जाईल.अशी माहिती महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी रविवार दि.२९ रोजी पत्रकारांशी बोलताना दिली. जनतेने कुठेही घाबरू नये.पर्याप्त एल पी जी आणि पेट्रोल, डिझेल देशात आहे. प्रवीण परदेशी समिती संपूर्ण शेतकऱ्यांची कर्जमाफी कशी असणार आहे.राज्यातील ज्या व्यक्तींना कर्जमाफीची गरज आहे तो अल्पभूधारक,अत्यल्प भूधारक त्यांना कर्जमाफी झाली पाहिजे याकरिता एस ओ पी तयार होत आहे. धनदांडग्या लोकांना कर्जमाफी ▶▶ उर्वरित पान २ वर

# युद्धभूमीतून भारतासाठी दिलासा!

## 94 हजार मेट्रिक टन LPG घेऊन दोन टँकर भारताकडे रवाना; 'होर्मुझची सामुद्रधुनी' केली पार

**वृत्तसंस्था**

अमेरिका-इस्रायल आणि इराण यांच्यात सुरू असलेल्या संघर्षामुळे जगभरातील ऊर्जा पुरवठ्यात अडथळा निर्माण झाला आहे. यादरम्यान भारताकडे येणारे सुमारे ९४ हजार मेट्रिक टन एलपीजी घेऊन येणारे दोन टँकर होर्मुझची सामुद्रधुनी सुरक्षितपणे पार करून



भारताच्या दिशेने येत आहेत, अशी माहिती सरकारने दिली आहे. अमेरिका-इस्रायल आणि इराण यांच्यात सुरू असलेल्या युद्धामुळे होर्मुझच्या सामुद्रधुनीतून होणारी जहाजांची वाहतूक जवळपास ठप्प झाली आहे. मात्र, मित्र राष्ट्रांच्या जहाजांनी इराणी प्रशासनाशी समन्वय साधला तर ते या जलमार्गाने प्रवास करू शकतात असे इराणने म्हटले आहे. होर्मुझच्या या अरुंद मार्गाने सुरक्षितपणे ▶ उर्वरित पान २ वर

## इराणवर अण्वस्त्र हल्ला झाल्यास भारतावर परिणाम होईल का? कोणत्या देशांना सर्वाधिक धोका ?

इस्रायल आणि अमेरिकेने इराणवर केलेल्या हल्ल्यानंतर मध्यपूर्वेत तणाव निर्माण झाला आहे. हे युद्ध इतके तीव्र झाले आहे की अमेरिका इराणवर अण्वस्त्र हल्ला करणार का, अशी चर्चा सुरू झाली आहे. जर अमेरिकेने इराणवर अण्वस्त्र हल्ला केला, तर त्याचा भारतावर परिणाम होईल का ? त्याचे किरणोत्सर्ग भारतापर्यंत पोहोचतील का ? असे प्रश्नही उपस्थित होत आहेत. तज्ज्ञांनी दिलेल्या माहितीनुसार, इराणमधील प्रमुख अणुऊर्जा केंद्रांपासून भारताच्या पश्चिम सीमेपर्यंतचे अंतर सुमारे २००० ते २५०० किलोमीटर आहे. अणुस्फोट झाल्यानंतर जड किरणोत्सर्गी कण काहीशे किलोमीटरच्या परिसरातच जमिनीवर पडतात. त्यामुळे भारतात तात्काळ गंभीर परिणाम होण्याची शक्यता कमी आहे. मात्र, वातावरणात मिसळलेले सूक्ष्म किरणोत्सर्गी कण वाऱ्यामुळे दूरवर जाऊ शकतात. जर वाऱ्याची दिशा पश्चिमेकडून पूर्वेकडे असेल, तर ४८ ते ७२ तासांत हे कण भारतापर्यंत पोहोचू शकतात. अशा परिस्थितीत गुजरात, राजस्थान, पंजाब आणि दिल्लीसारख्या भागांत या कणांचा प्रभाव जाणवू शकतो. ▶ उर्वरित पान २

## इराणनं अमेरिकेचे आकाशातले 'कान-डोळे' फोडले!

# 6000 कोटींच्या विमानाचा केला कोळसा, सौदीतील तळावर मोठा हल्ला

**वृत्तसंस्था**

अमेरिका आणि इस्रायलनं युद्ध पुकारल्यानंतर इराणने कडवा प्रतिकार सुरू केला आहे. अमेरिका आणि इस्रायलवर इराणने प्रतिहल्ले सुरुच ठेवले आहेत. इराणच्या आक्रमकतेमुळे अमेरिका आणि इस्रायल या दोन्ही देशांची डोकेदुखी वाढली आहे.

अशातच अमेरिकन लष्करी तळावर इराणने केलेल्या हल्ल्यानं अमेरिका चांगलीच हादरली आहे. सौदी अरेबियातील अमेरिकन तळावर केलेल्या हल्ल्यानं अमेरिकेच्या युद्ध



मोहिमेला झटका बसला आहे.

पश्चिम आशियातील युद्ध आता एका महत्त्वाच्या वळणावर पोहोचले आहे. जगातील सर्वात शक्तिशाली देश असलेल्या अमेरिकेला सर्वात मोठा लष्करी धक्का बसला आहे. सौदी अरेबियातील 'प्रिन्स सुल्तान एअरबेस'वर इराणने केलेल्या क्षेपणास्त्र आणि ड्रोन हल्ल्यात अमेरिकन हवाई दलाचे अत्यंत महत्त्वाचे Boeing E-3 Sentry हे पाळत ठेवणारे विमान पूर्णपणे उद्ध्वस्त झाले आहे. 'वॉल स्ट्रीट जर्नल'ने ▶▶ उर्वरित पान २ वर

## जिल्हा प्रशासनाला तिरडी भेट लक्ष्यवेधी आंदोलन




**बीड । प्रतिनिधी**

दि.३० मार्च सोमवार रोजी सकाळी साडे ११ वाजता जिल्हाधिकारी कार्यालय बीड... स्थानिक पातळीवर महसूल, पोलिस, कृषी किंवा ग्रामविकास यंत्रणा दाद देत नसल्याने शेवटी हताश होऊन सर्वसामान्य नागरिक जिल्हाधिकारी कार्यालयासमोर न्यायासाठी उपोषणाला बसतात. आंदोलन कट्यावर आंदोलकांसाठी साधा निवारा नाही. उन्हाचा तडाखा वाढल्याने आंदोलकांची हेळसांड होत असुन रिकाम्या पोटी उन्हात बसल्यामुळे एखादी ▶▶ उर्वरित पान २ वर

# समाधान शिबिर अभियान पिंपळवाडी येथे उत्साहात संपन्न

## नागरिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद ; शेकडो लाभार्थ्यांना विविध प्रमाणपत्रांचे वाटप

**बीड । प्रतिनिधी**

शासनाच्या महसूल व वन विभागामार्फत राबविण्यात येत असलेल्या छत्रपती शिवाजी महाराज महाराजस्व अभियान २८ मार्च रोजी पिंपळवाडी येथे नागरिकांच्या उत्स्फूर्त प्रतिसादात आणि उत्साही वातावरणात संपन्न झाले . पिंपळवाडी येथील जि.प.प्रा.शाळा पिंपळवाडी येथे आयोजित करण्यात आलेल्या या शिबिरामध्ये शेतकरी , ग्रामस्थ , महिला बचत गट , विद्यार्थी तसेच विविध सामाजिक घटकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून शासनाच्या विविध सेवांचा लाभ घेतला .

राज्य शासनाने महसूल प्रशासन अधिक लोकाभिमुख , पारदर्शक आणि गतिमान करण्याच्या उद्देशाने छत्रपती शिवाजी महाराजांच्या नावाने हे महाराजस्व अभियान सुरू केले आहे . नागरिकांना महसूल विभागाच्या विविध सेवा त्यांच्या गावातच उपलब्ध करून देणे , प्रलंबित प्रकरणांचा तातडीने निपटारा करणे तसेच शासनाच्या विविध योजनांची माहिती तळागाळापर्यंत पोहोचवणे हा या अभियानाचा मुख्य उद्देश आहे . पिंपळवाडी येथे आयोजित शिबिराने या उद्दिष्टांना प्रत्यक्ष स्वरूप दिले असल्याचे चित्र पाहायला मिळाले . या कार्यक्रमाचे आयोजन जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आले होते . कार्यक्रमास , निवासी उपजिल्हाधिकारी शिवकुमार स्वामी , उपविभागीय अधिकारी कविता जाधव, अनिरुद्ध सानप , गट विकास अधिकारी तसेच प्रशांत जाधवर , नायब तहसीलदार यांची प्रमुख उपस्थिती लाभली . प्रशासनातील वरिष्ठ अधिकाऱ्यांच्या उपस्थितीमुळे या शिबिराला विशेष महत्त्व प्राप्त झाले . कार्यक्रमास महसूल मंडळातील आजी माजी सरपंच तसेच महसूल विभागातील व इतर विविध विभागातील अधिकारी आणि कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते . तलाठी मंडळ अधिकारी संघटनेचे जिल्हाध्यक्ष पुरुषोत्तम आंधळे , महादेव चौरे , दादासाहेब शेळके तसेच बीड तालुक्यातील सर्व महसूल मंडळ अधिकारी , ग्राम महसूल अधिकारी , महसूल सेवक आणि तहसील कार्यालयातील कर्मचारी उपस्थित होते .चऱ्हाटा महसूल मंडळातील १३ गावचे सरपंच , उपसरपंच , पोलीस पाटील , ग्रामपंचायत सदस्य , माजी जिल्हा परिषद सदस्य , माजी पंचायत समिती सदस्य, सर्व ग्रामपंचायत अधिकारी, सहायक कृषी अधिकारी, महसूल सेवक, महावितरण चे कर्मचारी,आरोग्य अधिकारी व कर्मचारी, अंगणवाडी पर्यवेक्षिका आणि अंगणवाडी सेविका, आशा सेविका,तसेच महिला बचत गट , शेतकरी गट , विद्यार्थी आणि शेतकरी बांधव



मोठ्या संख्येने या शिबिरात सहभागी झाले. नागरिकांच्या मोठ्या उपस्थितीमुळे कार्यक्रमाला लोकाभिमुख स्वरूप प्राप्त झाले . या शिबिराच्या माध्यमातून विविध विभागांचे माहितीपर स्टॉल्स उभारण्यात ▶▶ उर्वरित पान २ वर

◆ संपादकीय...

# गॅस, डिझेल पेट्रोल वर सरकारचे नाही कंट्रोल



इस्राईल अमेरिका आणि इराण यांच्या युद्ध संघर्षामध्ये आज जग होरपळून निघत आहे. सगळ्यात जास्त झळ बसत आहे ती भारताला. आखाती देश आपसात लढले तरी झळ मात्र भारताला बसते. भारत ही फार मोठी बाजारपेठ आहे. प्रचंड लोकसंख्येच्या गरजा लक्षात घेता मोठ्या प्रमाणात दळणवळन असल्यामुळे सर्वाधिक पेट्रोल डिझेल गॅस ची गरज भारताला भासते. मागणी मोठी पण पुरवठा नाही परिणामी इतर देशाकडून आयात केली जाते. इराक, इराण, रशिया, सौदी अरेबिया, अमेरिका, कुवेत या सारख्या देशांकडून आपण कच्चे तेल विकत घेतो. रिफाइन करून उद्योगपती आणि सरकारी पोट भरले की आपले पोट भरण्यासाठी फिरणाऱ्या चाकाला गती देण्यासाठी इंधन म्हणून आपनास पेट्रोल डिझेल गॅस मिळतो. पेट्रोल आणि डिझेल यावरती केंद्रशासन व राज्य शासन यांचे मिळून जवळपास ५0 ते ५५% कर असतात. याचा अर्थ पेट्रोलची किंमत १00रुपये गृहीत धरली तर जवळपास ५0 रुपये आपण शासनाला कर म्हणून देतो.मग इतकी मोठी बाजारपेठ, इतकी मोठी कायम मागणी तरी देखील आखाती देश, अमेरिका, रशिया आपणास ब्लॅकमेल केल्यासारखे आणि आपले स्वामी असल्यासारखे वेटीस धरतात. अमेरिकेला जगाची पोलीस आणि सर्व शक्तिमान म्हणून मिरवायचे असेल तर कच्च्या तेलावर संपूर्ण नियंत्रण अमेरिकेचेच हवे असे वाटते. नुकतीच व्हेनझुला येथे सैनिक कार्यवाही करून अमेरिकेने तेथील तेलावर नियंत्रण मिळवले. आखाती देशामधील सौदी अरेबिया कुवेत ओमान यासारख्या देशातील तेलावर देखील अमेरिकेचे नियंत्रण आहे. इराण मधील तेलाच्या साठ्यावर अमेरिकेची नजर असून त्यांच्यावर देखील अमेरिकेने युद्ध थोपविले आहे. इजरायलला इराण परमाणु संपन्न होऊ नये याची भीती आहे तर अमेरिकेचा स्वार्थ हा फक्त तेथील तेल आणि गॅस पुरवठ्यावर नियंत्रण मिळवणे हा आहे. या सर्व घडामोडी मध्ये संपूर्ण जग वेटीस धरले जात आहे आणि पेट्रोल डिझेल गॅस यांचा भडका उडत आहे. खरंच कोणाचे कंट्रोल आहे हे कळतच नाही. कच्च्या तेलाचे भाव स्थिर नाहीत, पुरवठा साखळी कधी बिघडेल सांगता येत नाही. पण या सर्व बाबीचा परिणाम भारतातील गरिबात गरीब व्यक्तीवर पडतो. या समस्यावर नक्कीच तोडगा काढला पाहिजे. समृद्ध इथेनॉल, इ व्हेइकल, सार्वत्रिक वाहन व्यवस्था वापर, अजून नवीन तंत्र अवलंबविले तरच पर्याय निर्माण होऊन या देशांची मक्तेदारी थांबेल !..

# गतिमान प्रशासनाचा 'मराठवाडा पॅटर्न'

महाराष्ट्र शासनाने राबवलेला '१५० दिवसांचा ई-गव्हर्नन्स सुधारणा कार्यक्रम' राज्याच्या प्रशासकीय इतिहासातील एक ऐतिहासिक मैलाचा दगड ठरला आहे. प्रशासकीय कामाची पुनर्रचना, संपूर्ण डिजिटायझेशन आणि कृत्रिम बुद्धिमत्तेचा (-ख) प्रभावी वापर या त्रिसूत्रींवर आधारलेल्या या कार्यक्रमाने प्रशासनाचा चेहरामोहरा बदलून टाकला. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या उपस्थितीत सह्याद्री अतिथीगृहात काल (२८ मार्च) पार पडलेला गौरव सोहळा हा याच 'डिजिटल क्रांती'चा साक्षीदार होता. २४ तास उपलब्ध असणाऱ्या डिजिटल सुविधांमुळे आता सरकारी कार्यालयांमधील रांगा कमी होताना दिसतील, 'किमान शासन, कमाल सुशासन' सूत्र मराठवाड्याने खऱ्या अर्थाने प्रत्यक्षात उतरवले आहे.

लातूर: कल्पकता आणि तंत्रज्ञानाचा वापर

जिल्हाधिकारी वर्षा ठाकूर-घुगे यांच्या दूरदर्शी नेतृत्वाखाली लातूरने ई-प्रशासनात अभूतपूर्व झेप घेतली आहे. १७९.२५ गुणांसह राज्यात चौथा क्रमांक पटकावणाऱ्या लातूरच्या जिल्हाधिकाऱ्यांना मुख्यमंत्र्यांच्या हस्ते 'उत्कृष्ट जिल्हाधिकारी' म्हणून सन्मानित करण्यात आले.

लातूरचे यश केवळ आकडेवारीपुरते मर्यादित नाही, तर त्यात संवेदनशीलतेचाही वाटा आहे. 'भाषिणी'चा वापर करत प्रशासनाने जिल्ह्याचे संकेतस्थळ तब्बल २३ भाषांमध्ये नागरिकांना उपलब्ध करून दिले, ज्याचा लाभ गेल्या वर्षभरात ५.३१ लाखांहून अधिक नागरिकांनी घेतला. 'सेवा हक्क कायद्याची' प्रभावी अंमलबजावणी करत ९७.९३% अर्जांचा मुदतीत निपटारा



करण्यात आला. यासह विविध नाविन्यपूर्ण उपक्रम जिल्हाधिकारी कार्यालय राबवत आहे.

धाराशिव: ग्रामीण विकासाला तंत्रज्ञानाची जोड

लातूरप्रमाणेच धाराशिव जिल्ह्यानेही तंत्रज्ञान आणि ग्रामीण प्रश्न यांची उत्तम सांगड घालत १८५.२५ गुणांसह राज्यात तिसरा क्रमांक पटकावला. जिल्हाधिकारी कीर्ती किरण पुजार यांच्या मार्गदर्शनाखाली धाराशिवने स्मार्ट कार्यप्रणालीचा नवा आदर्श निर्माण केला.

नागरिकांना पुरवठा विभाग आणि संजय गांधी निराधार योजनेची माहिती घरबसल्या देण्यासाठी 'तुळजाई' चॅटबॉट वरदान ठरत आहे. अधिकारी-कर्मचाऱ्यांसाठी 'कल्पवृक्ष' ही स्मार्ट जीआर प्रणाली उपयुक्त ठरत असून, 'डिस्ट्रिक्ट डॅशबोर्ड'मुळे योजनांच्या प्रगतीवर अचूक लक्ष ठेवणे शक्य झाले आहे. विशेषतः 'जीवनरेखा' या डिजिटल प्रणालीने शेतरस्ते आणि पांदण रस्त्यांवरील अतिक्रमणे हटवून शेतकऱ्यांचे वर्षानुवर्षांचे वाद कायमस्वरूपी मिटवले आहेत.

नांदेड पोलीस: आधुनिकीकरणातून सुरक्षिततेकडे- महसूल प्रशासनासोबतच मराठवाड्याच्या पोलीस दलानेही तंत्रज्ञानाच्या वापरात राज्याला दिशा दाखवली आहे. पोलीस उपमहानिरीक्षक शहाजी उमाप यांच्या नेतृत्वाखाली नांदेड परिक्षेत्राने १२१.२३ गुणांसह राज्यात थेट प्रथम क्रमांक मिळवला आहे.

तक्रारींच्या जलद चौकशीसाठी 'संवेदना' हे एआय आधारित मॉडेल, गुन्हे तपासाला गती देणारे 'एरसश्रश एूश' आणि 'खबर हेल्पलाईन' या उपक्रमांमुळे गुन्हेगारीवर मोठा वचक बसण्यासाठी मदत होते आहे. पोलिसांनी सुरू केलेल्या 'फीडबॅक प्रणाली'मुळे जनतेचा खाकी वर्दीवरील विश्वास अधिक दृढ झाला असून फाईल्सचा निपटारा अत्यंत वेगाने होत आहे.

विभागाचा दबदबा- मराठवाड्याचे यश सर्वंकष आहे. विभागीय आयुक्त जितेंद्र पापळकर यांच्या मार्गदर्शनाखाली छत्रपती संभाजीनगर विभागाने राज्यात द्वितीय क्रमांक पटकावून प्रशासकीय उत्कृष्टतेचे दर्शन घडवले. या यशात छत्रपती संभाजी नगर, हिंगोलीनेही मोठी भर घातली असून, छत्रपती संभाजी नगर, हिंगोली जिल्हा परिषदांना त्यांच्या प्रभावी व लोकाभिमुख उपक्रमांसाठी मुख्यमंत्र्यांच्या हस्ते विशेष पुरस्काराने गौरवण्यात आले.

विशेष म्हणजे, तळागाळातील प्रशासनातही हा बदल झिरपला आहे. 'सेवाकर्मी प्लस' अंतर्गत १०० पैकी १०० गुण मिळवणाऱ्या राज्यातील १७ नगरपरिषदांपैकी तब्बल ९ नगरपरिषदा एकट्या मराठवाड्यातील आहेत. यात लातूरमधील उदगीर, अहमदपूर, निलंगा, औसा; धाराशिवमधील कळंब, तुळजापूर, लोहारा, नळदुर्ग आणि छत्रपती संभाजीनगरमधील सिल्लोड या नगरपरिषदांचा समावेश आहे. तर राज्यातील आठ जिल्हा परिषदांमध्ये मराठवाड्यातील छत्रपती संभाजी नगर आणि हिंगोली आहेत.

मराठवाड्यातील जिल्हे, स्थानिक स्वराज्य संस्था आणि पोलीस विभागाने मिळवलेले यश केवळ स्पर्धेपुरते मर्यादित नाही. तंत्रज्ञान, पारदर्शकता आणि उत्तरदायित्व यांच्या त्रिवेणी संगमातून प्रशासनाने जनतेचा जो विश्वास संपादन केला आहे, तो 'विकसित महाराष्ट्र २०४७' चा भक्कम पाया आहे. मराठवाड्याने राज्यासमोर ठेवलेला हा गतिमान प्रशासनाचा 'पॅटर्न' आगामी काळात सर्वांसाठी नक्कीच दिशादर्शक ठरेल.

**-डॉ. श्याम टरके**
**सहायक संचालक (माहिती)**
**विभागीय माहिती कार्यालय, लातूर**

# मार्च एंड... गुत्तेदारासाठी सरकारी पेंड ......

आर्थिक वर्ष संपण्यासाठी अवघे दोन ते तीन दिवस बाकी आहेत. सर्वच शासकीय कार्यालयामध्ये प्रशासकीय मान्यता प्रदान करणे तांत्रिक मान्यता प्रदान करणे निधी वितरण करणे पुरवठा आदेश देणे,कार्यारंभ आदेश देणे यासारख्या प्रशासकीय दस्तऐवजाचा सुळसुळाट चालू आहे. होय ही सरकारी कागदपत्रे म्हणजे सरकारी तिजोरीची चावी. चावीने तिजोरी उघडा आणि बिल काढून घ्या. गुत्तेदारांना आणि सरकारी योजनाना खिरापत वाटण्यासाठी असलेला अंतिम महिना म्हणजे मार्च एंड. खरतर ब्रिटिश राजवटीमध्ये १८६७



साली १ एप्रिल ते ३१ मार्च हे वित्तीय वर्ष घोषित करण्यात आले. आजही ही पद्धत चालू आहे. कर प्रणाली ,लेखापरीक्षण करणे, बँकेने आपली कामे पूर्ण करणे, सरकारी योजना व सरकारी कामे पूर्ण करणे याचा ३१ मार्च हा शेवटचा दिवस असतो. वर्षभर प्रलंबित असणाऱ्या असंख्य कामाचा निपटारा या महिन्यामध्ये केला जातो. बऱ्याचदा अनेक बोगस प्रशासकीय मान्यता देणे, टेंडर विना कामे पूर्ण करून घेणे , कागदोपत्री कामे दाखवून बिले उचलणे यासारखे अनेक प्रकार आपल्याला या महिन्यांमध्ये पहावयास मिळतात. खरतर वर्षभर नियमित सर्व कामे हर एक टप्प्यावर पूर्ण करणे आवश्यक आहे पण जशी जशी महसूली जमा वाढत जाते आणि शासकीय लेखाजोखा अंदाजपत्रक द्वारे दिसून येतो त्या प्रमाणे तरतूद वितरित करून ऋण फेडले जाते. कामे पूर्ण करून घेतली जातात. मग लगीन घाई प्रमाणे मार्च एंड आला की कामाचा धडाका सुरू होतो. मार्च एंड म्हणजे खरंच गुत्तेदार यांच्यासाठी सरकारी पेंड आहे असेच वाटते. अधिकारी, कर्मचारी, दलाल यांना पण या पेंडेची चव घेता येते. याला पर्याय नाहीच मुळी. कारण सगळ्या जगभरात आप आपली देशाची आर्थिक वर्ष आहेत आणि त्या पद्धतीने आर्थिक कारभार चालतो. रोमन देवता मार्स यांच्या नावावरून मार्च महिना असे नाव पडले असून मी रोमन देवतेलाच प्रार्थना करतो की जनतेच्या पैशातून भरलेली ही तिजोरी रिकामी करताना सर्व मंत्री, अधिकारी, बँकर्स, गुत्तेदार, लेखापरीक्षण यंत्रणा यांना चांगले, दर्जे दार उत्तम काम करण्याची सदबुद्धी दे.

◆ पान ९ वरून पुढे...

## महाराष्ट्राच्या राजकारणात....

राज्याचे उपमुख्यमंत्री अजित दादा होते. तोच मान सुनेत्रा वहिनींना मिळावा ही आमची भूमिका स्पष्ट होती. त्यानंतर सुनेत्रा वहिनी पक्षाच्या राष्ट्रीय अध्यक्ष झाल्या. राज्याच्या उपमुख्यमंत्रीदेखील झाल्या आहेत. सुनेत्रा वहिनी यांच्या नेतृत्वात राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष मोठा होत असेल, सुनेत्रा वहिनी यांचं नेतृत्व मान्य असेल तर दोन्ही राष्ट्रवादी विलीनीकरण करुन एकत्रपणाने पुढे जात असेल तर आम्हालादेखील त्याचा अभिमान असेल, असं मोठं वक्तव्य सुनील शेळके यांनी केलं आहे. सुनील शेळके यांच्या या वक्तव्यावर राष्ट्रवादी काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष तथा ज्येष्ठ नेते सुनील तटकरे यांनी एबीपी माझा वृत्तवाहिनीला प्रतिक्रिया दिली आहे. सुनील तटकरे काय म्हणाले? आमदार सुनील आण्णा शेळके हे पुणे जिल्ह्यातील प्रभावी नेते आहेत. ते तरुण आमदार आहेत. अजित दादांचे विश्वासू सहकारी म्हणून त्यांनी नेहमीच उत्तम पद्धतीने काम केलं आहे. ते मावळ मतदारसंघातून मोठ्या फरकाने निवडून आले आहेत. त्यामुळे त्यांनी जी काही भावना व्यक्त केली ती व्यक्तीगत होती की त्यांच्याकडे यासंदर्भात काही माहिती होती त्याबाबत मला कल्पना नाही, अशी प्रतिक्रिया सुनील तटकरे यांनी दिली. सुनील आण्णा यांनी जे मत व्यक्त केलं आहे ते त्यांनी सांगितलं आहे. एक नक्की आहे की, अजित पवार यांच्या निधननंतर सुनेत्रा वहिणी यांच्या नेतृत्वात पक्षाचं काम पुढच्या कालावधीत सुरू राहावं. हा निर्णय त्यांच्या सर्वांच्या सहमतीने राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाने घेतला. वहिनी ज्या पद्धतीने उपमुख्यमंत्री असतील किंवा राष्ट्रीय अध्यक्ष म्हणून कारभार करत आहेत, अतिशय संयमाने, सोशिकतेने, मनावर प्रचंड मोठा आघात झालेला असताना ज्या पद्धतीने जबाबदारी सांभळत आहेत ही बाब आमच्या सर्वांसाठी अभिमानास्पद आहे, असं सुनील तटकरे म्हणाले. सुनील शेळके यांनी विलीनीकरणाबाबत म्हटलं आहे, पण विलीनीकरणाबाबत तशी काही चर्चा आहे का? ते मला माहिती नाही. समजा, जर असेल तर त्या संदर्भातील अंतिम निर्णय सुनेत्रा वहिनी घेतील, असंही तटकरे म्हणाले. दोन्ही पक्षांच्या विलीनीकरणावर भाजपचा दबाव आहे का? भाजपकडून कधी दबाव राहिलेलाच नाही. कारण ज्यावेळी आम्ही अजित दादांच्या नेतृत्वात एनडीएमध्ये सहभागी होण्याचा निर्णय घेतला. देशाचे पंतप्रधान नरेंद्र मोदी, केंद्रीय गृहमंत्री अमित शाह, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस या सर्वांनी आम्हाला त्या प्रक्रियेत मार्गदर्शन केलं. आमच्या एनडीएमध्ये सहभाग हा देशाचा आणि राज्याच्या प्रगतीमध्ये राहिला. त्यानंतरच्या ज्या घडामोडी झाल्या त्या सर्वांनी पाहिलेल्या आहेत. तो निर्णय अजित दादांनी घेत असताना त्यांच्या निर्णयासोबत आम्ही सर्व जण राहिलो, अशी माहिती सुनील तटकरे यांनी दिली. त्यानंतरच्या कालावधीत भाजप पक्षाने राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या कुठल्याच बाबतीत केव्हाच हस्तक्षेप केला नाही. याउलट भारतीय जनता पक्षाच्या केंद्रीय आणि राज्याच्या नेतृत्वाने आम्हाला नेहमीच एक मित्रपक्ष म्हणून सन्मानाची वागणूक दिली. त्यामुळे त्यांचा दबाव या विषयाबाबत कधी नव्हता. राहिला विषय पक्षांतर्गतचा, तर पक्षांतर्गत आमचं कुणाचं काही म्हणण्याचं कारणच नाही. त्यामुळे तसे असेल तर वहिनी या संदर्भातील निर्णय सुनेत्रा वहिनी घेतील. या क्षणाला माझ्याकडे या संदर्भातली कुठलीही माहिती नाही. त्यामुळे मी त्यावर काही भाष्य करु इच्छित नाही, अशी भूमिका तटकरे यांनी मांडली. ज्येष्ठ

◆ पान ९ वरून पुढे...

आमदार सुनील तटकरे यांनी कोणत्या मुद्द्यावरुन वक्तव्य केलं आहे ते मला माहिती नाही. त्यांनी मुलाखतीत असताना त्यांना विचारलेल्या प्रश्नावर उत्तर देत असताना वक्तव्य केलं का, मला त्याबाबत माहिती नसल्याने मी त्या विषयावर अधिक भाष्य करु इच्छित नाही, असं मत सुनील तटकरे यांनी मांडलं. सुरुवातीच्या काळात आम्ही ज्यावेळेला निर्णय घेतला तो त्यांच्या सहमतीनेच घेतला की, त्या उपमुख्यमंत्री असतील आणि पक्षाच्या राष्ट्रीय अध्यक्ष पदाची जबाबदारी असेल. यानंतर विलीनीकरणाच्या विषयावर पडदाच पूर्णपणाने पडला असल्याने आमचा सुनेत्रा पवार यांच्यासोबत या विषयावर चर्चा करण्याचा मुद्दा कधी आलाच नाही, अशीदेखील प्रतिक्रिया सुनील तटकरे यांनी दिली.

## 1500 फुटापर्यंतचे....

देऊन काय फायदा आहे.त्यामुळे थोडा वेळ होईल पण मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या मार्गदर्शनात कमीटेड कर्जमाफी आम्ही करणार आहोत. असेही बावनकुळे म्हणाले. राष्ट्रीय महामार्गावरील भूसंपादनात जर शेतकऱ्याला कमी मोबदला मिळाला तर लवादाकडे जाव लागत.अशी २८००० प्रकरणे प्रलंबित होती यासाठी आम्ही ५७ लवादांची नियुक्ती केली आहे.पुढील तीन महिन्यात या शेतकऱ्यांच्या केसेस अंतिम होतील यासाठी सरकारने निर्णय घेतला आहे.राष्ट्रीय महामार्गावरील जर काही प्रश्न निर्माण झाले असतील तर त्याबाबत रविवार दि.२९ रोजी केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांच्यासोबत बैठकीचे आयोजन केले आहे.पश्चिम बंगालमध्ये ममता बॅनर्जी निवडणूक हरणार आहे.आणि भाजपा आघाडी ५१ टक्के मतदान घेऊन जिंकणार आहे. यामुळे घाबरून ममता बॅनर्जी अनेक संस्थांना धमक्या देत आहेत.त्यांनी कितीही धमक्या दिल्या तरी तेथील जनता भाजपा आघाडीला मतदान करेल.असेही बावनकुळे यांनी स्पष्ट केले.

## 94 हजार मेट्रिक....

बाहेर पडणारी ही भारताची नवी जहाजे आहेत. शुक्रवारी समोर आलेल्या एलएसईजी (डङएॠ) जहाज ट्रॅकिंग डेटानुसार, आतापर्यंत एलपीजी गॅसच्या ४ टँकर्सनी हा जलमार्ग यशस्वीपणे ओलांडला आहे, तर आणखी ३ टँकर्स अजूनही सामुद्रधुनीच्या पश्चिम भागात आहेत. पश्चिम आखाती क्षेत्रात अजूनही ४८५ भारतीय खलाशांसह भारताचा ध्वज असलेली एकूण १८ जहाजे आहेत, असे सरकारने म्हटले आहे. भारत हा जगातील दुसऱ्या क्रमांकाचा सर्वात मोठा एलपीजी आयातदार देश आहे. भारतात गेल्या वर्षी ३३.१५ दशलक्ष टन गॅसचा वापर केला गेला. भारताच्या एकूण गरजेपैकी सुमारे ६० टक्के गॅस हा आयात केला जातो आणि विशेष म्हणजे या आयातीपैकी सुमारे ९० टक्के गॅस हा मध्य पूर्वेतील देशांतून येतो.

## इराणनं अमेरिकेचे....

या संदर्भात खळबळजनक वृत्त दिले असून, या एका विमानाची किंमत आणि त्याचे महत्त्व पाहता अमेरिकेचे अब्जावधींचे नुकसान झाले आहे.ए-३ हे केवळ एक विमान नसून ते आकाशातील एक फिरते 'रडार स्टेशन' आहे. शेकडो किलोमीटर दूरवरून येणारी शत्रूची क्षेपणास्त्रे आणि विमाने टिपण्याची क्षमता यात आहे. रणांगणाची रिअल-टाइम माहिती देणारे हे

◆ पान ९ वरून पुढे...

विमान 'AW-CS' यंत्रणेने सज्ज होते. एक प्रकारे हे विमान अमेरिकेसाठी आकाशातील कान-डोळे होते. आता हे कान-डोळे इराणने फोडून काढले आहेत. धक्कादायक बाब म्हणजे, अमेरिकेकडे अशा प्रकारची केवळ १६ विमाने सुस्थितीत उरली होती, त्यापैकी एक आता इराणने मातीमोल केले आहे. शुक्रवारी झालेल्या या भीषण हल्ल्यात केवळ विमानाचेच नुकसान झाले नाही, तर १२ अमेरिकन सैनिक गंभीर जखमी झाले आहेत. तसेच इंधन भरणाऱ्या अनेक विमानांनाही मोठी क्षति पोहोचली आहे. या विमानाचा पर्याय म्हणून पाहिले जाणारे ए-७ Wedgetail हे विमान खरेदी करायचे झाल्यास अमेरिकेला एका विमानासाठी तब्बल ७०० दशलक्ष डॉलर्स म्हणजेच सुमारे ५,८०० कोटी रुपये मोजावे लागणार आहेत. या हल्ल्यामुळे अमेरिकेची मध्यपूर्वेतील हवाई सुरक्षा यंत्रणा खिळखिळी झाली असून, इराणच्या या धाडसाने पेंटागनमध्ये चिंतेचे वातावरण पसरले आहे.

## जिल्हा प्रशासनाला....

अनुचित घटना घडण्याची शक्यता नाकारता येत नाही. गेल्या ४ वर्षांपासून जिल्हाधिकारी कार्यालयासमोर आंदोलनकर्त्यांसाठी निवारा शेड, पिण्याचे पाणी, स्वच्छतागृहे या मुलभूत सुविधांसाठी वारंवार निवेदने आणि आंदोलनानंतरही जिल्हा प्रशासन याकडे गांभीर्याने पाहत नसल्याने यांच्या निषेधार्थ जिल्हा प्रशासनाला तिरडी भेट देण्यात येणार आहे. आंदोलनकर्ते यांनी उपस्थित रहावे असे आवाहन डॉ.गणेश ढवळे लिंबागणेशकर यांनी केले आहे.

## समाधान शिबिर...

आले होते . महसूल विभागाशी संबंधित जमीन नोंदणी , खातेफोड , वारस नोंद , सातबारा उतारे , विविध दाखले व प्रमाणपत्रे तसेच शासनाच्या विविध योजनांची माहिती नागरिकांना देण्यात आली . नागरिकांनी आपल्या अडचणी मांडल्या आणि संबंधित अधिकाऱ्यांनी त्यांना आवश्यक मार्गदर्शन केले .शिबिरामध्ये महसूल विभागाच्या विविध सेवांचा प्रत्यक्ष लाभ नागरिकांना देण्यात आला . यामध्ये जिवंत सातबारा ( मयत खातेदार कमी करणे ) , डिजिटल सातबारा वाटप , वारस फेरफार , वर्ग - २ चे वर्ग -१ मध्ये रूपांतर , ई - पिक पाहणी , ग्रीस्टॅक नोंदणी , ई - वसुली पावती , सेवामित्र प्रमाणपत्र , प्रकल्पग्रस्त प्रमाणपत्र , पानंद रस्ते योजना , रस्त्यांच्या नोंदी सातबारा उताऱ्यावर घेणे , ई - केवायसी प्रक्रिया , आधार कॅम्प , ई - शिधापत्रिका वाटप , लक्ष्मी मुक्ती योजना लाभ , रक्तदान शिबिर , अभिलेख दुरुस्ती , मोफत आरोग्य तपासणी , घरकुल मंजुरी आदेश , गायरान मंजुरी आदेश तसेच मागेल त्याला शेततळे योजना याबाबत नागरिकांना सविस्तर माहिती देण्यात आली . या शिबिरामध्ये मोठ्या प्रमाणावर विविध सेवा नागरिकांना देण्यात आल्या . त्यामध्ये डिजिटल सातबारा उताऱ्यांचे वाटप करण्यात आले . तसेच डिजिटल शिधापत्रिकांचे वाटप करण्यात आले . महसूल विभागाशी संबंधित ४२ फेरफार प्रकरणांचा निपटारा करण्यात आला . विविध योजनां अंतर्गत प्रमाणपत्रांचे वितरण करण्यात आले. आयुष्यमान भारत कार्डचे वाटप करण्यात आले . तसेच नागरिकांची मोफत आरोग्य तपासणी करण्यात आली . संजय गांधी निराधार योजना आणि श्रावण बाळ योजना लाभार्थ्यांसाठी या शिबिरात विशेष सुविधा उपलब्ध

◆ पान ९ वरून पुढे...

करून देण्यात आली होती . लाभार्थ्यांचे हयात प्रमाणपत्र ऑनलाईन करून देण्याची सुविधा उपलब्ध करून देण्यात आल्यामुळे अनेक वृद्ध नागरिकांना मोठा दिलासा मिळाला .या शिबिरामुळे महसूल विभागाच्या सेवा नागरिकांच्या दारी उपलब्ध झाल्याने नागरिकांनी समाधान व्यक्त केले . अनेक शेतकरी आणि ग्रामस्थांनी प्रशासनाशी थेट संवाद साधत आपल्या समस्या मांडल्या . अधिकाऱ्यांनी त्या समस्यांवर मार्गदर्शन करून काही प्रकरणे जागेवरच निकाली काढली . त्यामुळे नागरिकांना तालुका कार्यालयाच्या वारंवार फेऱ्या मारण्याची गरज भासली नाही . यावेळी बोलताना उपरोक्त अधिकारी यांनी नमूद केले की महाराष्ट्र शासनामार्फत ही अत्यंत महत्त्वाची योजना नागरिकांसाठी सुरू करण्यात आलेली आहे . प्रशासनाकडून नागरिकांच्या सर्व समस्यांचे निराकरण करण्यात येईल . कार्यक्रमादरम्यान उपस्थित मान्यवरांनी नागरिकांना शासनाच्या योजनांचा लाभ घेण्याचे आवाहन केले . प्रशासन आणि नागरिक यांच्यातील संवाद अधिक मजबूत होण्यासाठी अशा शिबिरांचे मोठे महत्त्व असल्याचे त्यांनी सांगितले . छत्रपती शिवाजी महाराजांच्या लोकाभिमुख प्रशासनाच्या विचारांप्रमाणे शासनाच्या सेवा थेट नागरिकांपर्यंत पोहोचविण्याचा प्रयत्न या अभियानातून होत असल्याचे यावेळी अधोरेखित करण्यात आले . या शिबिराच्या यशस्वी आयोजन करण्यासाठी मंडळ अधिकारी महादेव जायभाये तसेच ग्राम महसूल अधिकारी बंडु आगलावे, अथर्व झेंड, मिनल खांदे, अश्विनी डोळस व माधुरी आर्दड यांनी पुरेपूर प्रयत्न केले. एकूणच छत्रपती शिवाजी महाराज महाराजस्व अभियान अंतर्गत आयोजित करण्यात आलेले हे शिबिर प्रशासनाच्या लोकाभिमुख कार्यपद्धतीचे प्रभावी उदाहरण ठरले . नागरिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद , विविध विभागांचा समन्वय आणि प्रशासनाची तत्परता यामुळे हे शिबिर यशस्वीपणे पार पडले . शासनाच्या योजना तळागाळापर्यंत पोहोचविण्याच्या दृष्टीने अशा प्रकारची शिबिरे महत्त्वाची भूमिका बजावत असल्याची भावना उपस्थित नागरिकांनी व्यक्त केली . कार्यक्रमाचा शेवटी श्री गणेश बहिरवाळ उपसरपंच पिंपळवाडी यांनी सर्वांचे आभार मानून कार्यक्रम संपल्याचे जाहीर केले.

## इराणवर अण्वस्त्र...

मात्र, त्याची तीव्रता कमी असेल, असे सांगितले जाते. इराणमध्ये अणुहल्ला झाल्यास त्याचा सर्वाधिक परिणाम शेजारी देशांवर होऊ शकतो. यामध्ये इराक, तुर्की, आर्मेनिया, अझरबैजान, तुर्कमेनिस्तान, अफगाणिस्तान आणि पाकिस्तान यांसारख्या देशांचा समावेश होतो. तसेच, इराणच्या दक्षिणेकडील सौदी अरेबिया, कुवैत, बहरीन, कतार आणि संयुक्त अरब अमिराती या देशांनाही धोका आहे. जर इराणमधील अणुऊर्जा प्रकल्पांवर हल्ला झाला, तर किरणोत्सर्गी गळतीमुळे अरबी समुद्रातील पाणी प्रदूषित होऊ शकते. याचा परिणाम समुद्री जीवसृष्टीवर, पिण्याच्या पाण्यावर आणि अर्थव्यवस्थेवर होऊ शकतो. तज्ज्ञांच्या मते, अणुबॉम्बपेक्षा कार्यरत अणुभट्टी किंवा अणुकचरा साठवण केंद्रांवर हल्ला अधिक घातक ठरतो. अणुस्फोटाचा परिणाम काही काळानंतर कमी होतो, मात्र अणुभट्टीतून बाहेर पडणारे स्ट्रॉन्शियम, सीझियम आणि आयोडीनसारखे घटक माती व पाण्यात मिसळून दीर्घकाळपर्यंत नुकसान करतात. त्यामुळे कर्करोगासारख्या आजारांचा धोका वाढू शकतो.

Daily Marathwada Patra Owner, Printer, published and Editor Dattatray Sakharam Narnale has Printed in Gugladevi, Printers Subhash Road, Malives, Kabad Galli, Beed ( Rural) City, Beed Beed 431122 (Maharashtra). Office of Dainik Marathwada Patra Subhash road, Malives, Kabad Galli, Beed Tq- Beed Dist- Beed pin 431122 (Maharashtra) Mo. 9822152955, E-mail- dailymarathwadapatra2021@gmail.com, epaper: https://marathwadapatra.com, Eportal-https://marathwadapatra.com
हे पत्र प्रकाशक मुद्रक व मालक दत्तात्रय सखाराम नरनाळे यांनी गुगळादेवी प्रिंटर्स, सुभाष रोड, माळीवेस, कबाड गल्ली, बीड, ता.जि. बीड - ४३११२२ (महाराष्ट्र) येथे छापून कार्यालय दैनिक मराठवाडा पत्र सुभाष रोड, माळीवेस, कबाडगल्ली, बीड ता. जि. बीड - ४३११२२ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. मोबा. ९८२२१५२९५५ संपादक - दत्तात्रय सखाराम नरनाळे, E-mail-marathwadapatra@gmail.com, epaper: https://marathwadapatra.com, Eportal-https://marathwadapatra.com

दैनिक मराठवाडा पत्र



# कडा येथे 'पंडित दीनदयाळ उपाध्याय महाभियान २०२६' शिबिराचा उत्साहात शुभारंभ



## सहा दिवस चार मंडळांतून कार्यकर्त्यांचा उत्स्फूर्त प्रतिसाद; संघटन बळकटीसाठी मार्गदर्शन

**आष्टी । प्रतिनिधी**

कडा येथील परमेश्वर मंगल कार्यालयात आष्टी व कडा मंडळाच्या संयुक्त विद्यमाने आयोजित 'सक्षम कार्यकर्ता - सशक्त संघटन' या संकल्पनेवर आधारित 'पंडित दीनदयाळ उपाध्याय महाभियान २०२६' या भव्य प्रशिक्षण शिबिराचा शुभारंभ अत्यंत उत्साहपूर्ण वातावरणात पार पडला. शिबिराच्या प्रारंभीच चारही मंडळांतील कार्यकर्त्यांनी मोठ्या संख्येने उपस्थिती लावत या उपक्रमाला उत्स्फूर्त प्रतिसाद दिला. पदाधिकारी, बूथप्रमुख, शक्तिकेंद्रप्रमुख तसेच युवा कार्यकर्त्यांचा विशेष सहभाग यावेळी पाहायला मिळाला.

या सहा दिवसीय प्रशिक्षण शिबिराचा मुख्य उद्देश कार्यकर्त्यांना वैचारिकदृष्ट्या सक्षम करणे, संघटन अधिक बळकट करणे आणि पक्षाच्या धोरणांची प्रभावी अंमलबजावणी करण्यासाठी आवश्यक दिशा देणे हा आहे. दिवसभर विविध सत्रांद्वारे कार्यकर्त्यांना समाजजागृती, वैचारिक अधिष्ठान, भारतीय जनता पक्षाची कार्यपद्धती, पक्षाचा इतिहास, कार्यविस्तार, तसेच केंद्र व राज्य सरकारच्या विकासकामांची माहिती देण्यात आली. राष्ट्रभक्ती, सामाजिक बांधिलकी आणि संघटनात्मक कार्याचे महत्त्व यावरही सखोल मार्गदर्शन करण्यात आले.

यावेळी महामंडलेश्वर स्वामी त्रिविक्रमानंद शास्त्री यांनी राष्ट्रीय स्वयंसेवक संघ व भारतीय जनता पक्षाच्या विचारधारेवर भाष्य करत कार्यकर्त्यांना प्रेरणादायी मार्गदर्शन केले. जनसंघापासून सुरू झालेल्या विचारप्रवाहाने आज वटवृक्षाचे रूप घेतले असून समाजाला एकत्रित ठेवणे, राष्ट्रहित जागृत ठेवणे आणि योग्य दिशा देणे हे या विचारधारेचे वैशिष्ट्य असल्याचे त्यांनी अधोरेखित केले. केवळ दोन खासदारांपासून सुरू झालेला पक्ष आज देशातील क्रमांक एकचा पक्ष बनला असून पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखाली भारताने सर्वच क्षेत्रांत भक्कम स्थान निर्माण केले असल्याचे त्यांनी सांगितले.

यानंतर दयावान मुंडे यांनी पक्षाच्या संघटनात्मक रचनेवर व कार्यपद्धतीवर सविस्तर मार्गदर्शन करत कार्यकर्त्यांनी गावपातळीवर अधिक सक्रिय राहून जनसंपर्क वाढवावा, तसेच पक्षाची विचारधारा प्रत्येक घटकापर्यंत पोहोचवावी, असे आवाहन केले.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी ड. साहेबराव म्हस्के होते. यावेळी आमदार सुरेश धस, आदिनाथ सानप, आष्टी मंडळाध्यक्ष रमेश गावडे, कडा मंडळाध्यक्ष अनिल ढोबळे यांच्यासह विविध पदाधिकारी व कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते. उपस्थित मान्यवरांनी आपल्या मनोगतातून कार्यकर्त्यांना प्रेरणा दिली.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन आष्टी विधानसभा प्रमुख गणेश शिंदे यांनी प्रभावीपणे केले, तर पहिल्या सत्राचे आभार अनिल ढोबळे यांनी मानले. संपूर्ण शिबिरात कार्यकर्त्यांचा उत्साह, शिस्तबद्धता आणि संघटनाबद्दलची निष्ठा प्रकर्षाने जाणवली. या प्रशिक्षणामुळे कार्यकर्त्यांना नवचैतन्य व स्पष्ट दिशा मिळाल्याची भावना व्यक्त होत आहे.

दरम्यान, या महाभियान शिबिराचा समारोप आज होणार असून भाजप प्रवक्ते तथा नगरसेवक नवनाथ बन यांच्या मार्गदर्शनाखाली समारोप सत्र पार पडणार आहे. या सत्रातही कार्यकर्त्यांना महत्त्वपूर्ण मार्गदर्शन मिळणार असल्याने सर्वांचे लक्ष समारोपाकडे लागले आहे.

## आष्टीत महात्मा फुले जयंती उत्सव उत्साहात; सर्वधर्मीयांनी सहभागी व्हावे- सुरज शिंदे यांचे आवाहन

**आष्टी । प्रतिनिधी**

क्रांतीसूर्य महात्मा जोतिराव फुले यांच्या जयंतीनिमित्त आष्टी शहरात ११ एप्रिल २०२६ रोजी विविध सामाजिक, सांस्कृतिक व वैचारिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले असून या उत्सवात सर्वधर्मीय व सर्व समाजघटकांनी मोठ्या संख्येने सहभागी व्हावे, असे आवाहन सामाजिक कार्यकर्ते सुरज किसन शिंदे यांनी केले आहे.



याबाबत बोलताना शिंदे म्हणाले की, महात्मा फुले यांनी बहुजन समाजासह महिलांसाठी शिक्षणाची दारे उघडून समाज परिवर्तनाची नवी दिशा दिली. त्यांचे कार्य कोणत्याही एका जातीपुरते मर्यादित नसून संपूर्ण मानवजातीच्या कल्याणासाठी होते. मात्र सध्याच्या काळात महापुरुषांना जातीच्या चौकटीत बंदिस्त करण्याची प्रवृत्ती वाढत आहे, ही चिंतेची बाब असून ही मानसिकता बदलणे अत्यंत गरजेचे आहे.ते पुढे म्हणाले, 'विद्येविना मती गेली' हा जीवनमंत्र देणारे फुले हे खऱ्या अर्थाने आधुनिक भारताचे शिल्पकार होते. त्यांनी शेतकरी, मजूर व वंचित घटकांच्या उन्नतीसाठी आपले संपूर्ण आयुष्य अर्पण केले. त्यामुळे त्यांची जयंती साजरी करणे हे केवळ एका समाजाचे नव्हे, तर प्रत्येक जागरूक भारतीयाचे कर्तव्य आहे. विषमता व अन्यायाविरुद्ध लढणाऱ्या प्रत्येक व्यक्तीने या उत्सवात सहभागी होणे आवश्यक आहे.विविध कार्यक्रमांची रेलचेल महात्मा फुले जयंतीनिमित्त ११ एप्रिल रोजी सकाळी १० वाजता आष्टी शहरात त्यांच्या प्रतिमेचे पूजन करून अभिवादन करण्यात येणार आहे.यानंतर सायंकाळी भव्य मिरवणुकीचे आयोजन करण्यात आले असून यामध्ये विविध राज्यांतील पारंपरिक वाद्य पथकांचा सहभाग असणार आहे.याच पार्श्वभूमीवर १० एप्रिल रोजी श्री संत सावता मंदिर येथे रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे. तसेच युवकांमध्ये वैचारिक जागृती घडवून आणण्यासाठी वक्तृत्व स्पर्धेसारखे कार्यक्रमही आयोजित करण्यात आले आहेत.या सर्व कार्यक्रमांमध्ये शहर व परिसरातील नागरिक, युवक, माता-भगिनी तसेच सर्व समाजघटकांनी कोणताही भेदभाव न करता मोठ्या संख्येने सहभागी व्हावे आणि क्रांतीसूर्य महात्मा फुले यांच्या कार्याप्रती कृतज्ञता व्यक्त , असे आवाहन सुरज शिंदे यांनी केले आहे.

## सफेपुरात शिवजन्मोत्सव उत्साहात; गुणवंतांचा, नवनियुक्त पोलीस पाटलांचा सन्मान सोहळा संपन्न

**बीड । प्रतिनिधी**

शिवजन्मोत्सव समिती सफेपुर यांच्या वतीने आयोजित शिवजन्मोत्सव सोहळ्यानिमित्त कौतुक व मार्गदर्शन कार्यक्रम अत्यंत उत्साहात आणि दिमाखात पार पडला. कार्यक्रमासाठी समाजसेवक श्री गंगाधर नाना काळकुटे, श्री भारत बाप्पा काळे, मा. श्री विजय कागदे सर यांच्यासह अनेक मान्यवर, जि. प. शाळेचे मुख्याध्यापक, शिक्षक, गावातील प्रतिष्ठित नागरिक, महिला भगिनी आणि विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

कार्यक्रमाची सुरुवात मान्यवरांच्या हस्ते छत्रपती शिवाजी महाराजांच्या प्रतिमेचे



पूजन करून करण्यात आली. यावेळी चि. प्रीतम केशव घोडके, कु. अमृता बाळासाहेब घोडके व कु. अमृता दिगंबर मेंगडे या गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार करण्यात आला. तसेच विद्यार्थ्यांना घडवणाऱ्या जि. प. शाळेचे मुख्याध्यापक श्री साळुंखे सर, श्री अहिरे सर व इतर शिक्षकांचा गौरव करण्यात आला.

सफेपुर गावचे सुपुत्र श्री अशोक करडूले यांची केंद्रप्रमुखपदी नियुक्ती झाल्याबद्दल त्यांचा विशेष सन्मान करण्यात आला. तसेच श्री संदीप पांडुरंग चव्हाण यांची एसबीआय बँकेत लिपिकपदी निवड झाल्याबद्दलही त्यांचा गौरव करण्यात आला. याचप्रमाणे बालाघाट परिसरातील विविध गावांतील नवनिर्वाचित पोलीस पाटील यांचा देखील सत्कार करण्यात आला. यामध्ये वानगावचे श्री गणेश जोगदंड, सावरगावचे श्री प्रदीप जोगदंड, खंडाळ्याचे श्री विष्णू बर्डे, पोथरा गावच्या श्रीमती सुजाता हावळे/लहाने, चौदसवाडीच्या श्रीमती ऋतुजा ढवळे/चव्हाण तसेच सफेपुरचे आकाश कारगुडे यांचा समावेश होता. कार्यक्रमात श्री विजय कागदे सर, श्री गंगाधर नाना काळकुटे व श्री भारत बाप्पा काळे यांनी प्रेरणादायी मार्गदर्शन केले. त्यांच्या विचारांनी उपस्थित विद्यार्थी व ग्रामस्थ मंत्रमुग्ध झाले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन श्री नामदेव घोडके सर यांनी केले. एकूणच हा शिवजन्मोत्सव सोहळा उत्साहपूर्ण वातावरणात यशस्वीरित्या पार पडला.

## सदाशिव नाईक यांना मातृशोक



**बीड । प्रतिनिधी**

चिंचाळा ता वडवणी येथील सौ. उषा जीवनराव नाईक वय (७२) यांचे दिर्घ आजाराने रविवार दि. २९ रोजी माजलगाव येथे उपचार सुरू असताना निधन झाले. वर्तमानपत्र जाहिरात प्रमुख सदाशिव नाईक यांच्या त्या आई आहेत. चिंचाळा ता. वडवणी येथील स्मशानभूमीत त्यांच्यावर रविवारी संध्याकाळी ६ वाजता अंत्यसंस्कार होतील. त्यांच्या पश्चात पती, तीन मुले, मुलगी, सुना, नातवंडे असा परिवार आहे.

## हिवरा गडलिंग येथे मातोश्री बहुउद्देशीय सेवाभावी संस्थेतर्फे 'शेतकरी अभियान' संपन्न आधुनिक शेती व शासकीय योजनांबाबत शेतकऱ्यांना मोलाचे मार्गदर्शन

**बीड । प्रतिनिधी**

बुलढाणा जिल्ह्यातील सिंदखेड राजा तालुक्यातील हिवरा गडलिंग येथे दिनांक २९ मार्च २०२६ रोजी मातोश्री बहुउद्देशीय सेवाभावी संस्था, बीड यांच्या वतीने 'शेतकरी अभियान' यशस्वीरीत्या राबविण्यात आले. ग्रामीण भागातील शेतकऱ्यांना प्रगत तंत्रज्ञानाची जोड आणि शासकीय योजनांचा लाभ मिळवून देण्याच्या उद्देशाने आयोजित केलेल्या या अभियानाला ग्रामस्थांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला.



या विशेष अभियानामध्ये संस्थेचे सचिव श्री. तेजस दिलीप पवार यांनी प्रमुख मार्गदर्शक म्हणून शेतकऱ्यांशी संवाद साधला. त्यांनी सध्याच्या काळातील आधुनिक शेतीचे महत्त्व आणि नवीन तंत्रज्ञान यावर सविस्तर माहिती दिली. यासोबतच, शासनाच्या विविध शेतकरी कल्याणकारी योजना, शेतीसाठी मिळणाऱ्या विविध सबसिडी (अनुदान) योजना आणि त्या मिळवण्याची योग्य पद्धत यावर त्यांनी अभ्यासपूर्ण मार्गदर्शन केले. त्यांच्या या मार्गदर्शनामुळे अनेक शेतकऱ्यांच्या शंकांचे निरसन झाले असून त्यांना नवीन दिशा मिळाली आहे.सदर कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी संस्थेचे सदस्य रोहन डोळस यांनी विशेष परिश्रम घेतले. याप्रसंगी संस्थेचे सचिव तेजस दिलीप पवार, रोहन डोळस, सदस्य यांच्यासह हिवरा गडलिंग गावातील शेतकरी बांधव आणि ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते. शेतकऱ्यांचे आर्थिक सक्षमीकरण आणि कृषी प्रगतीसाठी संस्थेने राबवलेल्या या स्तुत्य उपक्रमाचे परिसरात सर्वत्र कौतुक होत आहे.

## आदर्श मार्केट व्यापाऱ्यांच्या वतीने रामभक्तांसाठी अन्नदान

**बीड । प्रतिनिधी**

श्रीराम जन्मोत्सवानिमित्त शहरात मोठ्या उत्साहात मिरवणूक व शोभायात्रा काढण्यात आली. या धार्मिक सोहळ्यात सहभागी झालेल्या भाविकांसाठी सुभाष रोड येथील आदर्श मार्केट व्यापारी असोसिएशनचे अध्यक्ष तथा बीड शहर व्यापारी महासंघाचे शहराध्यक्ष प्रकाशराव कानगावकर यांच्या संकल्पनेतून अल्पोपहाराचे आयोजन करण्यात आले होते. सुभाष रोडवर मिरवणूक आली असता डॉ.योगेशभैय्या क्षीरसागर, नगरसेवक शुभम धुत, बीड शहर पोलीस निरीक्षक शितलकुमार बल्लाळ यांच्या हस्ते श्रीराम यांची महाआरती करण्यात आली. सर्व प्रमुख पाहुण्यांचे सत्कार करण्यात आले. महाआरती नंतर सर्व रामभक्तांना या उपक्रमांतर्गत रात्री सुमारे सहा ते दहा वाजेपर्यंत अन्नदान करण्यात आले. हजारो भाविकांनी या प्रसादाचा लाभ घेतला. यावेळी सुमारे चार क्विंटल पोहे, थंड पाण्याचे वाटप करण्यात आले असल्याची माहिती आयोजकांनी दिली. कार्यक्रमादरम्यान आदर्श मार्केटचे अध्यक्ष प्रकाशराव कानगावकर, आदर्श मार्केट व्यापारी संघटनेचे सचिव सुदाम चव्हाण, गणेश मुळे, अविनाश कानगावकर, विशाल मानकुस, आप्पा औताडे, अरुण देवधरे, महादेव गाडे, केतन भोज, ठाकूर मामा, मंगेश मानकुस, रामेश्वर मानकुस, मच्छिंद्र उपरे, सिध्देश्वर किवणे, राजु कानगावकर, मंगेश काळे, गणेश मानकुस, अमोल पतंगे, देवीदास मसुरे, निलेश पतंगे, राजु फुटाणे, राम शिंदे, विनायक पतंगे, दत्ता जगताप, शिवाजी शिंदे, ज्ञानेश्वर चव्हाण, दिपक पतंगे, गणेश उपरे, राहुल शिंदे, गणेश राऊत, ज्ञानेश्वर पंधारे, विनायक पतंगे, किरण वाघमारे, नारायण मानकुस, निलेश पतंगे, विकास दुबाले, गजानन मानकुस, राहुल उपरे, बप्पा घुगे, ओंकार उपरे,कुणाल उपरे, विनोद फटाले, रोशन, दत्ता उबे,

# ऊसतोड मजुराच्या लेकीची जिद्दीने घातली यशाला गवसणी ; कोमल नागरगोजे हिची अकोला पोलिस दलात निवड

**आष्टी । प्रतिनिधी**

जिद्द, चिकाटी आणि अथक परिश्रम यांच्या जोरावर कोणतीही उंची गाठता येते, ज्वलंत उदाहरण तालुक्यातील कऱ्हेवडगाव येथील कोमल लक्ष्मण नागरगोजे हिचे आहे. अत्यंत प्रतिकूल परिस्थितीचा सामना करत ऊसतोड मजुराच्या मुलीने थेट अकोला पोलिस दलात निवड झाली आहे. तिच्या या यशाने गावाच्या शिरपेचात मानाचा तुरा रोवला गेला आहे.

कोमल ही एका सामान्य आणि आर्थिकदृष्ट्या दुर्बल कुटुंबातील मुलगी. आई मंदाबाई आणि वडील लक्ष्मण नागरगोजे हे ऊसतोडणीसह रोजंदारी करून कुटुंबाचा उदरनिर्वाह करतात. घरात शिक्षणाचा वारसा नसतानाही आणि अत्यंत मर्यादित साधनसामग्रीत कोमलने शिक्षण पूर्ण केले. लहानपणापासूनच आई-वडिलांच्या कष्टाची जाणीव



असल्याने तिने शाळेसोबत ऊसतोडीच्या कामातही हातभार लावला.

घरची गरिबी, शिक्षणासाठी अपुऱ्या सुविधा, ग्रामीण भागातील अडचणी या सगळ्यांवर मात करत कोमलने पोलिस होण्याचे स्वप्न पाहिले. त्या स्वप्नासाठी तिने स्वतः ला पूर्णपणे झोकून दिले. दररोज पहाटे उठून धावणे, व्यायाम, शारीरिक चाचण्यांचा सराव आणि अभ्यास यांचा समतोल साधत ती सातत्याने प्रयत्न करत राहिली.

मागील एका भरती प्रक्रियेत अत्यंत थोडक्यात संधी हुकल्याने ती खचली नाही. उलट मी पोलिस होणारच हा निर्धार अधिक बळकट करत तिने नव्या जोमाने तयारी सुरू ठेवली. आर्थिक अडचणीमुळे शहरात राहून क्लासेस करणे शक्य नसतानाही, थोड्या दिवसांच्या मार्गदर्शनानंतर तिने घरीच अभ्यास सुरू ठेवला. अखेर तिच्या चिकाटीला यश मिळाले आणि २५ मार्च रोजी जाहीर झालेल्या निकालात तिची अकोला पोलिस दलात निवड झाली.

कोमलच्या या यशामुळे गावातील विद्यमान आजी, माजी सरपंच, सदस्य, सेवा सोसायटीचे पदाधिकारी तसेच ग्रामस्थांनी तिचे कौतुक करत अभिनंदनाचा वर्षाव केला आहे. कोमलचे वडील लक्ष्मण नागरगोजे यांनी अत्यंत कठीण परिस्थितीतही मुलीच्या शिक्षणासाठी तडजोड केली नाही. वेळप्रसंगी पोटाला चिमटा घेऊन तिच्या शिक्षणाचा व पोलिस भरतीच्या तयारीचा खर्च उचलला. कोमलने उज्वल यश मिळवत त्यांच्या कष्टाचे चीज केले आहे. कोमलने दररोज पहाटे सराव, धावणे, गोळाफेक, अशा शारीरिक चाचणी तयारी आणि अभ्यास यांचा संगम साधला. तिच्या सातत्यपूर्ण मेहनतीमुळेच तिने अकोला पोलिस दलात स्थान मिळवले. कोमलच्या यशामुळे कऱ्हेवडगाव व परिसरात आनंदाचे वातावरण निर्माण झाले आहे. गावकऱ्यांनी तिची गावभर मिरवणूक काढून भव्य नागरी सत्कार केला. तिची यशोगाथा इतर तरुणांसाठी प्रेरणादायी ठरणार आहे.

दैनिक महाराष्ट्राचा बुलंद आवाज ● छत्रपती संभाजीनगर ● जालना ● बीड ● परभणी ● लातूर ● नांदेड ● धाराशिव ● हिंगोली ● अहिल्यानगर

# मराठवाडा पत्र

● संपादक : दत्तात्रय सखाराम नरनाळे ● जिल्हा विशेष ● सोमवार दि. ३० मार्च २०२६ ●

# फोटोसेशन आणि पुरस्कार पुरता वृक्षलागवडीचा दिखावा

## इव्हेंट जिल्हाधिकारी यांनी विवेक जागा ठेवून वृक्षसंगोपणाची जबाबदारी निश्चित करावी ! निदान जिल्हाधिकारी यांच्या नावाची पाटी असलेलं झाडं तरी जगवा : डॉ. गणेश ढवळे

**बीड । प्रतिनिधी**

हरित महाराष्ट्र अभियानांतर्गत जागतिक विक्रमाच्या उद्देशाने एकाच दिवशी ३० लाख झाडे लावण्याची मोहीम राबविण्यात आली होती. मात्र बीड प्रशासनाने प्रत्यक्षात ७० लाख झाडे लावल्याचा दावा करत विधानसभेत वनमंत्री गणेश नाईक यांची दिशाभूल केली. यासोबतच ९० टक्के झाडे जिवंत असल्याचा दावा देखील प्रशासनाने केला आहे. प्रत्यक्ष परिस्थिती मात्र वेगळीच दिसून येत आहे. तत्कालीन उपमुख्यमंत्री व पालकमंत्री अजित पवार यांच्या हस्ते लावलेले खंडेश्वरी दिपमाळ परीसरात झाड देखील जिवंत ठेवण्यात प्रशासन अपयशी ठरल्याची टीका होत आहे.



पाली येथील नविन रेल्वे स्थानक परिसरात उद्घाटनावेळी लावण्यात आलेली १२ ते १५ फूट उंचीची झाडे पाण्याअभावी वाळण्याच्या स्थितीत असल्याचे दिसून येत आहे. जिल्हाधिकारी विवेक जान्सन यांच्या नावाचे फलक लावण्यात आलेल्या झाडांचेही संगोपन करण्यात प्रशासन अपयशी ठरल्याची बाब समोर आली असून ही अत्यंत लाजिरवाणी बाब असल्याची संतप्त प्रतिक्रिया सामाजिक कार्यकर्ते डॉ. गणेश ढवळे (लिंबागणेशकर) यांनी व्यक्त केली आहे.



**लागवडीचा केवळ दिखावा नको ; संगोपणाची जबाबदारी निश्चित करा**

हवामान बदल, प्रदूषण आणि जलसंकटाच्या पार्श्वभूमीवर मोठ्या प्रमाणात वृक्षलागवड केल्याचा गाजावाजा करण्यात आला. या उपक्रमाची नोंद 'इंडियन बुक ऑफ रेकॉर्ड'मध्ये झाल्याचा दावा करत त्याबद्दल उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या हस्ते प्रमाणपत्र देऊन जिल्हाधिकारी यांचा सन्मानही करण्यात आला होता. दि.१७ सप्टेंबर २०२५ रोजी रेल्वे स्थानकाच्या उद्घाटनप्रसंगी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री अजित पवार आणि पर्यावरण मंत्री पंकजा मुंडे यांच्या उपस्थितीत रस्त्याच्या कडेला १२ ते १५ फुट उंचीची मोठमोठाली झाडांची मोठ्या उत्साहात वृक्षलागवड करण्यात आली. या झाडांसोबत मान्यवरांच्या नावाच्या पाट्या लावण्यात आल्या होत्या.

मात्र, कार्यक्रम संपल्यानंतर कोणत्याही विभागाने या झाडांच्या संगोपनाची जबाबदारी घेतली नसल्याचे दिसून येत आहे. पालवण येथील नव्या रेल्वे स्थानक परिसरातील अनेक झाडे पाण्याअभावी वाळण्याच्या मार्गावर आहेत.

यामुळे केवळ फोटोसेशन आणि पुरस्कारांसाठी वृक्षलागवड करण्यापेक्षा प्रत्यक्ष संगोपनाची जबाबदारी निश्चित करणे अत्यावश्यक असल्याचे मत डॉ. गणेश ढवळे यांनी व्यक्त केले आहे. प्रशासनाने वृक्षलागवडसोबत वृक्षसंगोपनलाही तितक्याच गांभीर्याने घेतले पाहिजे, वृक्षसंगोपणाची जबाबदारी निश्चित करण्यात यावी अशी मागणी त्यांनी केली आहे.

# जिल्हास्तरीय महिला बचत गटांचे विक्री प्रदर्शन भरले हॉटेलात

## जिल्हा व महिला विकास विभागाच्या लाखो रुपयांची उधळपट्टी !

## बेजबाबदार अधिकाऱ्यांवर महिला व बालकल्याण मंत्र्यांनी निलंबनाची कारवाई करावी: करपे

**बीड । प्रतिनिधी**

बीड जिल्ह्यात सध्या महिला आर्थिक विकास महामंडळाच्या वतीने २०२६ मधिल जिल्हास्तरीय महिला बचत गटांच्या उत्पादित केलेल्या मालांचे दि.२७ मार्च ते २९ मार्च २०२६ असे तिनदिवसीय विक्री महोस्तव /प्रदर्शन आयोजित करण्यात आले आहे.सदर प्रदर्शन सुमारे सव्वादोन लाख लोकसंख्या असलेल्या बीड शहरात जालना रोडवरील हॉटेल यशराज इन येथे आयोजित केले आहे. वास्तविकता ग्रामीण भागातील महिला बचत गटातील सदस्यांना मोठी बाजारपेठ उपलब्ध व्हावी ,त्यांना खरेदी -विक्री चे व्यवहारिक ज्ञान मिळावे , शहरातील ग्राहकांना ग्रामीण भागातील दर्जेदार ,वस्तू उत्पादनांची विक्री व्हावी आदी उद्देशांसाठी महिला आर्थिक विकास महामंडळ दरवर्षी लाखो रुपये खर्च करून शहराच्या, जिल्ह्याच्या ठिकाणी ग्रामीण महिला बचत गटांच्या वतीने उत्पादित मालांचे वस्तूंचे विक्री प्रदर्शन /महोत्सव आयोजन करत असते परंतु काही भ्रष्ट अधिकाऱ्यांच्या मनमानी कारभारामुळे सदर विक्री प्रदर्शनाच्या उद्देशालाच हरताळ फासल्याचे समोर आले आहे. बीड शहरातील सार्वजनिक ठिकाणी सदर महोत्सवाचे प्रदर्शनाचे आयोजन करणे आवश्यक असताना एका व्यावसायिक हॉटेलमध्ये अत्यंत तोकड्या जागेत जिल्ह्यातून फक्त ३५ स्टॉलचे प्रदर्शन आयोजन केले आहे.तीन दिवसाच्या प्रदर्शनामध्ये महिला व बालकल्याण विभागाचे लाखो रुपये या ठिकाणी खर्च केले जाणार असून सहभागी झालेल्या ३५ स्टॉलधारक महिलांना याबाबत विचारणा केली असता आयोजकांवर त्यांनी नाराजी व्यक्त केली आहे. कारण त्यांनी उत्पादित केलेल्या मालाची विक्री अपेक्षेप्रमाणे झाली नसल्याचे सांगितले आहे. ज्या ठिकाणी ग्राहक वर्ग उपलब्ध आहे त्या सार्वजनिक ठिकाणी सदर प्रदर्शनाचे आयोजन केले असते तर महिलांना अधिक बाजारपेठ मिळाली असती मात्र शासनाचे लाखो रुपये खर्च दाखवून हडप करायच्या लालचे पोटी सदर प्रदर्शनाचे एका व्यवसायिक हॉटेलमध्ये तोकड्या जागेत आयोजन केले आहे ही गंभीर बाब क्रांतिकारी शेतकरी संघटनेने समोर आणली असून महिला व बालकल्याण मंत्री ना.अदिती तटकरे यांच्याकडे सविस्तर तक्रार करून बेजबाबदार अधिकाऱ्यावर निलंबनाची कारवाई करण्याची मागणी करण्यात येणार असल्याची माहिती क्रांतिकारी शेतकरी संघटनेचे जिल्हाध्यक्ष कुलदीप करपे यांनी दिली.



*बीड : येथील बेसिक कोचिंग क्लासेस च्या द्वितीय सत्र परीक्षेतील गुणवंत विध्यार्थ्यांचा पारितोषिक वितरण सोहळा डॉ. प्रफुल्ल सुस्कर यांच्या अध्यक्षतेखाली उत्साहात संपन्न झाला या वेळी संचालक श्री. महादेव वायभाट सर यांच्या सह गुरुजन व विद्यार्थी छाया चित्रात दिसत आहेत.*

# पत्रकार अमोल मुळे यांना मंत्री संजय शिरसाट यांच्या हस्ते पुरस्कार प्रदान

## ● शासनाकडून राष्ट्रपिता महात्मा गांधी पुरस्काराने गौरव

**बीड । प्रतिनिधी**

महाराष्ट्र शासनाच्या सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागाच्या वतीने व्यसनमुक्ती विषयावर लिखाणासाठी पत्रकारांना देण्यात येणारा राष्ट्रपिता महात्मा गांधी व्यसनमुक्ती सेवा सन्मान पुरस्कार बीड येथील पत्रकार दिव्य मराठीचे ब्यूरो चिफ अमोल मुळे यांना सामाजिक न्याय मंत्री संजय शिरसाट यांच्या हस्ते प्रदान करण्यात आला.



व्यसनमुक्तीबाबत समाजात जागृती व्हावी यासाठी लिखाण करणाऱ्या राज्यातील एका पत्रकाराला महाराष्ट्र शासनाच्या सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागाच्या वतीने दरवर्षी राष्ट्रपिता महात्मा गांधी यांच्या नावे हा पुरस्कार देण्यात येतो. हा पुरस्कार प्रतिष्ठेचा समजला जातो. सन २०२४-२५ सालचा पुरस्कार अमोल मुळे यांना जाहीर झाला होता. २६ मार्च रोजी मुंबई येथील यशवंतराव चव्हाण केंद्राच्या सभागृहात पुरस्कार वितरण सोहळा थाटात पार पडला. या कार्यक्रमास विधानसभेचे अध्यक्ष ॲड. राहुल नार्वेकर, समाजकल्याण विभागचे केंद्रीय राज्यमंत्री रामदास आठवले, सामाजिक न्याय विभागाचे मंत्री संजय शिरसाट, समाज प्रबोधनकार सत्यपाल महाराज, सामाजिक न्याय विभागाचे प्रधान सचिव डॉ. हर्षदीप कांबळे, समाजकल्याण आयुक्त दीपा मुधोळ- मुंडे यांची प्रमुख उपस्थिती होती. मान्यवरांच्या हस्ते अमोल मुळे यांना पुरस्कार प्रदान करण्यात आला. सन्मानचिन्ह, रोख रक्कम, सन्मानपत्र असे पुरस्काराचे स्वरुप होते.

# माजलगाव विधानसभा अध्यक्षाची धुरा माधव निर्मळ यांच्या खांद्यावर !

## माजलगावात भाजपची संघटनात्मक ताकद वाढणार

**माजलगाव । प्रतिनिधी**

माजलगाव विधानसभा मतदारसंघासाठी भारतीय जनता पक्षाने बीएलए-१ विधानसभा प्रमुखपदी माधवराव निर्मळ यांची नियुक्ती केली असून, यामुळे मतदार यादी पुनर्निरीक्षण अभियानाला गती मिळणार आहे. भारतीय जनता पार्टीच्या महाराष्ट्र प्रदेशकडून सुरू असलेल्या मतदार याद्यांच्या पुनर्निरीक्षण अभियानांतर्गत माजलगाव विधानसभा मतदारसंघासाठी बीएलए-१ विधानसभा प्रमुख म्हणून माधवराव निर्मळ यांची नियुक्ती करण्यात आली आहे. भाजप प्रदेशाध्यक्ष रवींद्र चव्हाण यांच्या स्वाक्षरीने जारी करण्यात आलेल्या अधिकृत पत्राद्वारे ही नियुक्ती जाहीर करण्यात आली. या नियुक्तीमुळे माजलगाव विधानसभा क्षेत्रात भाजपच्या संघटनात्मक कामाला नवी चालना मिळणार असल्याचे मानले जात आहे. बीएलए-१ विधानसभा प्रमुख या नात्याने माधवराव निर्मळ यांच्यावर मतदार याद्यांची पडताळणी, दुरुस्ती तसेच नव्या मतदारांची नोंदणी या महत्त्वाच्या कामकाजाची जबाबदारी सोपविण्यात आली आसल्याचे पत्र दि २६ मार्च २०२६ रोजी निर्मळ यांना देण्यात आले. दरम्यान, माजलगाव विधानसभा क्षेत्रातील पुनर्निरीक्षण प्रक्रिया अधिक गतिमान करण्यासाठी बीड जिल्हाध्यक्ष शंकर देशमुख हे जिल्हाभर काम पाहत आहेत. या पार्श्वभूमीवर संघटनात्मक पातळीवर समन्वय साधून कामकाज अधिक प्रभावी करण्याचा पक्षाचा प्रयत्न आहे. या



नियुक्तीबद्दल पक्षाच्या विविध स्तरातून माधवराव निर्मळ यांचे अभिनंदन करण्यात येत आहे.मतदार नोंदणी प्रक्रियेत प्रभावी कामगिरीचा विश्वास महाराष्ट्राचे संवेदनशील मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, मंत्री पंकजाताई मुंडे, डॉ. प्रितमताई मुंडे, भाजपाचे प्रदेशाध्यक्ष रविंद्र चव्हाण, बीड जिल्हाध्यक्ष शंकर देशमुख यांच्या मार्गदर्शनाखाली आगामी काळात मतदार नोंदणी व पडताळणी प्रक्रियेत प्रभावी कामगिरी करू, असा विश्वास माधव निर्मळ यांनी माध्यमांशी बोलताना व्यक्त केला. दरम्यान, बीड जिल्ह्यासह माजलगाव मतदारसंघातील सर्व समाजघटकांतील कार्यकर्त्यांना एकत्रित घेऊन संघटन बांधणी करणार असल्याचे त्यांनी सांगितले.

# महावीर जयंतीनिमित्त आष्टीत कत्तलखाने व मांसविक्री दुकाने बंद ठेवण्याचा निर्णय : नगराध्यक्ष जिया बेग

**आष्टी । प्रतिनिधी**

शहरात जैन धर्मातील २४ वे तीर्थंकर भगवान महावीर यांच्या जयंतीनिमित्त मंगळवार, दि.३१ मार्च रोजी विविध धार्मिक, सांस्कृतिक व सामाजिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले असून, संपूर्ण शहरात ही जयंती मोठ्या उत्साहात व भक्तिभावाने साजरी करण्याची तयारी सुरू आहे. महावीर जयंती हा जैन समाजासाठी अत्यंत पवित्र आणि महत्त्वाचा दिवस मानला जातो. भगवान महावीर यांनी दिलेला अहिंसा, सत्य, करुणा आणि सर्व जीवांप्रती दया या



मूल्यांचा संदेश लक्षात घेता, या दिवशी शहरात कोणत्याही प्रकारची जीवहानी होऊ नये, यासाठी आष्टी नगरपंचायतीने विशेष निर्णय घेतला आहे. नगराध्यक्ष जिया बेग यांनी दिलेल्या माहितीनुसार, मंगळवार, दि. ३१ मार्च रोजी महावीर जयंतीनिमित्त आष्टी शहरातील सर्व कत्तलखाने तसेच मटण, चिकन आणि मासे विक्री करणारी दुकाने दिवसभर पूर्णपणे बंद ठेवण्यात येणार आहेत. या आदेशाचे सर्व संबंधित मांस विक्रेते, कत्तलखाना चालक तसेच नागरिकांनी सहकार्य करून काटेकोर पालन करावे, असे आवाहन नगराध्यक्ष जिया बेग यांनी केले आहे. महावीर जयंतीच्या निमित्ताने संपूर्ण शहरात स्वच्छता, शांतता आणि धार्मिक एकात्मतेचे वातावरण निर्माण व्हावे, यासाठी आष्टी नगरपंचायतीकडून सर्वतोपरी प्रयत्न केले जात असल्याचेही नगराध्यक्ष जिया बेग नमूद केले.

# ठेवीदारांनों सावधान... आप आपल्या ठेव्या सुरक्षित करा...

## बीड जिल्ह्यात आठ ते नऊ वर्षात दहा मल्टी स्टेट पतसंस्थांनी पोबारा केला !



**तलवाडा । प्रतिनिधी**

राज्यभरासह बीड जिल्ह्यात आणेक गोरगरीब कष्टकरी शेतकरी नौकरदारासह आणेक सेवानिवृत्तांनी अधिकच्या लोभाला बळी पडुन आपल्या जीवन भराची कमाई सुरक्षितेच्या भावनेतुन अशा लोकांच्या हाती दिली की ठेवी लाखो करोडोच्या घरात जमा झाल्या अन काही फरकाने जवळपास दहा मल्टी स्टेट पत संस्थांनी रातोरात पोबारा केल्याचे सर्वश्रुत आसतांना आजही आणेक ठेवीदार मल्टी स्टेट पत संस्थांच्या मोहात आडकल्याचे निदर्शनास येत असुन या मोहजालातुन ठेवीदारांनी वेळीच बाहेर पडुन आप आपल्या ठेवी सुरक्षित ठेवाव्यात आसे जाणकारातुन बोलल्या जाउ लागले आहे. गेल्या काही दिवसा पासुन लॉकडाऊन लागन्याचे सुसंकेत विवीध माध्यमातून समोर येत असल्याने जर तर किंतु परंतु आस्या योगा योगातुन परत एकदा मोठ्या प्रमाणात ठेवीदार बांधवांच्या ठेवि बुडन्याचा धोखा संभवत असल्याचे जाणकार बोलु लागल्याचे ऐकावयास मिळु लागल्याच्या धर्तीवर ठेवीदारांनी सावघ होऊन आप आपल्या ठेव्याची सुरक्षितता जोपासावी आसे एकंदरीत चित्र सध्य स्थितितुन दिसुन येत आहे. ज्या ज्या वेळी ज्या काही मल्टी स्टेट पत संस्थांकडुन ठेवीदारांना आसा धोखा झाला त्या त्या वेळी अनेक लेकीचे लग्न मोडले तर कुणाचे नोकरीचे स्वप्न भंगल्याचे या पुर्वी देखील समोर आलेले आहे. तर आणेकांनी ठेवीचे पैसे वेळेवर मिळाले नाहीत म्हणुन आपले जीवन संपवल्याचे देखील वेळोवेळी समोर आलेले आहे. या मध्य ज्या काही मल्टी स्टेट पत संस्था ईमानदारीने तग धरुन आहेत त्यांची देखील विश्वासहर्ता पळ काढु मल्टी स्टेट पत संस्थांमुळे गमवल्या गत वाटु लागल्याचे बोलल्या जातय कुणाच्या कपाळावर थोडी लिहल्याले दिसुन येते की फ्रॉड करणार किंवा होणार म्हणुन दक्षता घेणे हाच एक संकल्प असल्याने ठेवीदारांनी काळजी घेणेच. महत्वाचे असल्याचे मत जाणकार बोलुन दाखु लागले आहेत. शहर जिल्हे तालुके वाईज प्रथमताह आस्या मल्टी स्टेट पत संस्थांनी लोभवाणी प्रस्धि करत ठेवीदारांना आकर्षित करुन मोठ्या प्रमाणावर ठेवी जमा होताच पोबारे केले. आता हा मोर्चा ग्रामीण भागात देखील वळल्या गेल्याचे निदर्शनास येत असल्याने ठेवीदारांनी जागृत होण्याची शक्यता वर्तवल्या जात आहे. गेवराई तालुक्यातील तलवाडासह ग्रामीण भागात मोठ्या प्रमाणात बँकाचे जाळे ठेवीदारांनों वेळ निघून जाण्या अगोदर ते पैसे काढून एखाद्या राष्ट्रीयकृत बँकेत पैसे ठेवा नसता धोखा होण्याची शक्यता जाणकारातुन वर्तवल्या जाऊ लागल्या आहेत.